# निशाणी १३ वरील आदेश

(प्रमोद दळवी वि.ग्रामपंचायत विलवडे )

CNR.No.MHSI06-000513-2023

१. प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दाखल करणेत आलेला असून, त्यायोगे वादीने निशाणी १ लगत दाखल असणाऱ्या दावा अर्जामध्ये ग्रामपंचायत विलवडे या प्रतिवादींच्या शिर्षकामध्ये त्याचेपुढे 'तर्फे सरपंच' असा मजकुर नमुद करणेस परवानगी मागितलेली आहे. वादीच्या मते, सदरचा मजकुर नजरचुकीने नोंद करावयाचा राहून गेलेला आहे. सदर प्रस्तावित दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असून, त्यामुळे मुळ दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही.

२. वादीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रस्तुतचा दावा आजरोजी प्रतिवादीस पाठविणेत आलेली समन्स व नोटीसचा अहवाल येणेवर नेमणेत आलेली आहे. प्रस्तुतचा दावा हा वादीने 'ग्रामपंचायत विलवडे' यास प्रतिवादी म्हणुन नोंद करुन त्यांचेविरुध्द दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे समन्स व नोटीस ग्रामपंचायत विलवडे यांना पाठविणेत आलेली असून त्याचा अहवाल आजरोजी न्यायालयात दाखल झालेला आहे. सदर समन्स व नोटीस ग्रामपंचायत विलवडे यांचे वतीने ग्रामपंचायत शिपाई यांनी स्विकारलेबाबतचा शेरा नमुद असल्याचे दिसत आहे. तथापि, आजरोजी ग्रामपंचायत विलवडे यांचे वतीने न्यायालयात कोणीही उपस्थित झालेले नाही. आजरोजी वादीने प्रतिवादीच्या नावामध्ये दुरुस्ती करणेकरीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सदरचा दावा हा आजमितीस प्राथमिक टप्प्यावर नेमणेत आलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये वादी मागत असलेली दुरुस्ती मंजूर केलेस प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, निश्चित प्रतिवादी यांना दावा समन्स व नोटीस यांची बजावणी होणार आहे. सबब, न्यायाचे कारणास्तव मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादीने सदर आदेशापासून १४ दिवसांचे आत दावा दुरुस्ती करणेची आहे.

३. वादीने पुढील नेमले तारीखेस दावा दुरुस्ती प्रत सादर करणेची आहे.

४. वादीने दावा दुरुस्त केलेनंतर 'सरपंच ग्रामपंचायत विलवडे' यांना दावा समन्स पाठविणेचे आहे.

DURGA BHAGAWAN SUTAR
Digitally signed by DURGA BHAGAWAN SUTAR
Date: 2023.06.03 16:54:39 +0530

( डी.बी.सुतार )

दिनांकः–०३/०६/२०२३.

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.